Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १०, अंक ३०] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १२-१८, २०२४/भाद्रपद २१-२७, शके १९४६ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७१.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक समूचित व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.बल्लारपूर-कलम १२७(२)-आदेश-टिपीव्ही-२-४५५७.—

ज्याअर्थी, बल्लारपूर नगर परिषदेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक समूचित व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२२०२-१२६०-प्र.क्र.-२ बी-२००४-नवि-९, दिनांक १६ ऑगस्ट, २००५ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे.) भागशः मंजूर केली असून ती दिनांक ०१ ऑक्टोबर, २००५ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेली आहे) व वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२२०२-१२६०-सीआर-२-(क)-२००४-नवि-९, दिनांक १८ जून, २००८ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक २८ जुलै, २००८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा बल्लारपूर येथील शिट क्र. १०, सि.स.क्र. २२/७ (स. क्र. ४४ पैकी) ५५०.८३ चौ.मी. क्षेत्र हे आ.क्र. ४, "मार्केट" (एकुण क्षेत्र ३.४४५ हे.) या आरक्षणाने बाधित होत असून (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी नियोजन व समूचित प्राधिकरण नगर परिषद, बल्लारपूर आहे (यापुढे "उक्त समूचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा बल्लारपूर येथील शिट क्र.१०, सि.स.क्र. २२/७ ( स. क्र. ४४ पैकी ) ५५०.८३ चौ. मी. क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक २४ जुलै, २०२१ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजाविलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केली नाही अथवा, उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांचेकडील पत्र क्र. ३३०६, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ अन्वये 'अर्जदार सौ. जाकीर खान यांनी दिनांक २६ जुलै, २०२१ ला महाराष्ट्र प्रादेशिक समूचित व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ अन्वये या कार्यालयास सूचना बजावलेली होती. सदर खरेदी सूचनेनुसार अर्जदार यांचे मागील ४० वर्षापासून वास्तव्य असतांना सुद्धा त्याची जागा आरक्षणात समाविष्ट करण्यात आली असल्याचे कळविले असून सदर जागा ४००० प्रति चौ. फुट. दराने नगर परिषदेला विकत घेण्यास विनंती केली. सदर सूचनेच्या अनुषंगाने सर्वसाधारण सभा दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ च्या ठराव क्र. ७ अन्वये सदर सूचनेच्या अनुषंगाने भूसंपादनाकरीता लागणारा निधी शासनाकडे मागणी करण्याकरिता सभेने मंजुरी प्रदान केली. सभेची मंजुरी मिळताच जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे भूसंपादनाचा प्रस्ताव दिनांक ९ डिसेंबर, २०२१ अन्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत सादर करण्यात आला व जमिनीचे मूल्यांकन करून विहित कालमर्यादेत भूसंपादन आवश्यक असल्यामुळे याबाबत कार्यवाही लवकरात लवकर करण्याची विनंती करण्यात आली. परंतु, दिनांक २१ एप्रिल, २०२२ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, बल्लारपूर यांनी सदर प्रकरणी नगर परिषद कार्यालयास त्रुटी कळविण्यात होत्या. सदर त्रुटी पूर्ण करण्याबाबत अर्जदारास या कार्यालयातर्फे दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यावर अर्जदार यांनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ च्या अर्जान्वये त्रुटी पूर्तता करुन नगर परिषद कार्यालयास कळविले होते. त्यावर नगर परिषद कार्यालयाने दिनांक १३ डिसेंबर, २०२२ अन्वये भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना पुनश्चः सादर करण्यात आला होता. त्यावर उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (सा.), चंद्रपूर यांच्या तर्फे दिनांक १८ जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही होत नसल्याचे कळवून प्रस्ताव माघारी पाठविण्यात आले. सदर पत्रान्वये अर्जदार यांना या कार्यालयाने दिनांक ०२ मे, २०२३ अन्वये कळविले आहे,' असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर व सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील अनुक्रमे पत्र क्र. २०५, दिनांक २३ जानेवारी, २०२४ व पत्र क्र. ७१२, दिनांक ३० एप्रिल, २०२४ अन्वये ' सदर प्रकरणी भूसंपादनाची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण झालेली नसल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम-१२७ मधील तरतुदीनुसार सदर आरक्षण व्यपगत झाले असून प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक समूचित व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) अन्वयेचे आदेश निर्गमित करण्यास हरकत वाटत नाही,' असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांचेकडून पत्र क्र. ५१६९, दिनांक २१ जून, २०२४ अन्वये प्राप्त मोजणी नकाशा व अद्ययावत मालमत्ता पत्रकाचे अवलोकन केले असता, उक्त जमीन मालक यांचे मालकीचे उक्त आरक्षणाखालील क्षेत्र हे स. क्र. ४४, शिट क्र. १० मधील सि.स.क्र. २२ पैकी या जमिनीमधील सूचनाकर्ते यांचे मालकीचे सि.स.क्र. २२/७ चे क्षेत्र ५५०.८३ चौ.मी. असल्याचे निदर्शनास येते;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीच्या ५५०.८३ चौ.मी. क्षेत्रावरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये समूचित प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा नगर पंचायती जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.—-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.—

## परिशिष्ट

| अ. क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | चौ. मी. |
| १ | बल्लारपूर नगर परिषद, मौजा बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. | आ. क्र. ४, " मार्केट " एकूण अंदाजे क्षेत्र ३.४४५ चौ. मी. | सर्व्हे क्र. ४४ पैकी शिट क्र. १०, सि.स.क्र. २२/७ | ५५०.८३ |

**टीप :—**(१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीनीच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर, जि. चंद्रपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक २२ ऑगस्ट, २०२४.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७२.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P.Ballarpur-Sec-127(2)-Order-TPV-II-4557.—

Whereas, the Development Plan of Ballarpur Municipal Council has been Partly sanctioned as per the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2202-1260-CR-2(B)-2004-UD-9, dated 16th August, 2005 (hereinafter referred to as " the said Notification ") and has come into force with effect from dated 01st October, 2005. (hereinafter referred to as " the said Sanctioned Development Plan") and the Excluded Plan has been sanctioned in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2202-1260-CR-2(C)-2004-UD-9, dated 18th June, 2008 & has come into force with effect from dated 28th July, 2008;

And whereas, in the said Sanctioned Development Plan, area admeasuring approximately 550.83 sq. mt. of the land bearing C.T.S. No. 22/7 of Sheet No. 10 (S. No. 44 pt.) of Mouza Ballarpur is affected by the Reservation Site

No. 4, " Market " (total area under reservation 3.445 Ha.) (hereinafter referred to as " the said Reservation ") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservstion is Municipal Council. Ballarpur (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the Land affected by the said Reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force:

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as " the said Land Owner ") of the Land bearing C.T.S. No. 22/7 of Sheet No. 10 (S. No. 44 pt.) admeasuring area approximately 550.83 sq.mt. which is affected by the said Reservation (hereinafter referred to as " the said Land " ) had served a notice as per the provisions of Section 127*(1)* of the said Act. (hereinafter referred to as " the said Notice " ) on the said Appropriate Authority on 24th July, 2021;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of Section 127 of the said Act:

And whereas, Municipal Council, Ballarpur *vide* Marathi letter No. नपब-यो.वि.-3306, dated 12th December, 2023 has communicated that, 'Applicant Mrs. Zakira Khan had served a notice, under Section 127 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966, on this office dated 26th July, 2021. According to the said notice, even though the applicant has been living for the past 40 years, it has been informed that his place has been included in the reservation and it was requested to Municipal Council to purchase the said place at the rate of 4000/- per Sq. Ft. Pursuant to the said notice, the General Body meeting Resolution No. 7, dated 08th September, 2021, the meeting granted approval to request the funds required for land acquisition from the Government in accordance with the said purchase notice. As soon as the approval of the meeting is received, the land acquisition proposal was submitted to the District Collector. Chandrapur through the Sub-Divisional Officer on 09th December, 2021, it was requested to take action in this regard at the earliest as after the valuation of land, the land acquisition proceeding is required to be completed within the prescribed time. But the shortcomings in the said proposal were communicated by the Sub-Divisional Officer, Ballarpur to the Municipal Council Office *vide* letter dated 21st April, 2022. Regarding completion of the said shortcomings, the applicant was informed by this office *vide* letter dated 13th September, 2022. The applicant fulfilled the shortcomings in the said proposal and reported to the Municipal Council Office *vide* letter dated 03rd October, 2022. After that, the proposal of land acquisition was once again forwarded to the District Collector, Chandrapur by the Municipal Council Office on 13th December, 2022. After that, Deputy Collector, Land Acquisition (सा), Chandrapur, informed that the said proposal is not being processed regarding availability of funds and is being sent back *vide* letter dated 18th January, 2023. According to the above letter, it was informed to the Applicant *vide* letter dated 02nd May, 2023;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur and Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur *vide* letter No. 205, dated 23rd January, 2024 and letter No. 712, dated 30th April, 2024 respectively have submitted report stating that, 'As the process of land acquisition in the said case has not been completed within the prescribed period, the said reservation has lapsed as per the provisions of Section 127 of the said Act and there is no objection to issue an order under Section 127 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in the matter'.;

And whereas, on perusal of the measurement plan and updated property documents of the said area under reservation, received from the Chief Officer, Municipal Council, Ballarpur *vide* letter No. 5169, dated 21st June, 2024, it is observed that the land owned by the said land owner is from S. No. 44 pt., C.T. S. No. 22/7 of Sheet No. 10 of area admeasuring 550.83 sq.m. is affected by the said Reservation.;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is

necessary to issue the order as per the provisions of Section 127*(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said land admeasuring area 550.83 sq.mt.;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of Section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December, 2016. has delegated the powers exercisable by it as per the provisions of Section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayats and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of Section 127*(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows—

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

| Sr. No. | Muncipal Council, Mouza, Taluka and District | Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approximate Area as per D. P. Report | Description of the said Land | Approximate area lapsed of the said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | Sq.mt. |
| 1 | Ballarpur Municipal Council, Mauja Ballarpur, Taluka-Ballarpur, Dist. Chandrapur. | Site No. 4 “Garden” Area 3445 Sq.mt. | S.No. 44 Pt. (CTS No. 22/7 of Sheet No.10) | 550.83 |

*Note* :—(1) The said land so released from the said Reservation shall become available to the said land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Development Plan.

(2) A Copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the areas of the said land which are lapsed from the said Reservation is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Ballarpur, District Chandrapur during office hours on all working days for inspection to public upto one month.

(3) This Order shall also be published on the Directorate’s official website *www.dtp.maharashtra.gov.in.*

AVINASH B. PATIL,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 22nd August, 2024.

ना.-एक-अ-२ (१५९४).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७३.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

### जाहीर सूचना

क्रमांक वशिक्र.-नपमु-नियोजन वि.- २०९-२०२४.—

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२२९८-४४३-प्र.क्र.१०२-९८-नवि-९, दिनांक २५ ऑक्टोबर, २००१ अन्वये विकास योजना मुल भागशः मंजुर असून ती दिनांक १५ डिसेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. २४१४-९९-प्र.क्र.५८-२०१४-नवि-९, दि. १० मार्च, २०१५ अन्वये मंजूर झालेली आहे.

नगर परिषद मुलने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये उपरोक्त मंजूर विकास योजना मुल मध्ये खाली दर्शविलेल्या तपशीलाप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे प्रस्तावित केले आहे. :—

**तक्ता**

| अ. क्र. | मौजा/ सर्व्हे क्र. | क्षेत्रफळ/ आराजी | विकास योजनेतील सध्याचा वापर | फेरबदल केल्यानंतर प्रस्तावित वापर | प्रशासक यांचे मंजुरीचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | हे. आर | | | | |
| १ | मौजा मुल, स.नं. ७४२<br>मौजा मुल, स.नं. ७४३ | क्षेत्र ०.४६<br>क्षेत्र ०.२९ | शेती | रहिवासी | २२ ऑगस्ट, २०२४ | १ |
| २ | मौजा मुल, स.नं. ८०५ | क्षेत्र ०.९२ | शेती | रहिवासी | २२ ऑगस्ट, २०२४ | २ |
| ३ | मौजा रामपूर तुकूम, स. नं. ७२ | क्षेत्र ०.६७ | शेती | रहिवासी | २२ ऑगस्ट, २०२४ | ३ |
| ४ | मौजा अंतरगाव पारडवाही सं. नं. ६४ | क्षेत्र १.०८ | शेती | रहिवासी | २२ ऑगस्ट, २०२४ | ४ |

उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा मुल नगर परिषदेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत सर्व जनतेस अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार अशी जाहीर सुचना देण्यात येते की, नियोजित फेरबदलासंबंधी जर कोणत्याही व्यक्तीला आक्षेप वा सूचना सूचवायच्या असतील तर त्यांनी ही सूचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत (३० दिवसात) मुख्याधिकारी, नगर परिषद, मुल यांचेकडे लेखी सादर कराव्यात. जेणेकरून उक्त कालावधीत आलेल्या सूचना व आक्षेपावर विचार करून नियोजित फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल.

मुल :
दिनांक २२ ऑगस्ट, २०२४.

**यशवंत पवार,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुल.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७४.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

*NOTIFICATION*

No. MCM-Planning dep.-209-2024.—

Government of Maharashtra,Urban Development Department *vide* there Notification No. TPS-2298-443-CR-102-98-UD-09, dated 25 October, 2001 sanctioned, part of the Development plan of Mul, has come into force from dated 15 December, 2001 and Excluded parts of the said development plan sanctioned *vide* government Notification No. TPS 2414-99-CR-58-2014-UD-09, dated 10 March, 2015.

The Municipal Council Mul proposed to make minor modification in the aforesaid sanctioned development plan under Section 37*(1)* of The Maharashtra Regional And Town Planning Act, 1966. The details about Proposed minor modification are as below.

DISCRIPTION

| Sr. No. | Mouza/ Survey No. | Area | Present Use in D.P. | Purposed use after Modification | Administrator's Approval resolution date | Resolution No. |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | H. A. | | | | |
| 1 | Mouza- Mul Survey No. 742 | Area 0.46 | Agriculture | Residential | 22 August, 2024 | 1 |
| | Mouza- Mul Survey No. 743 | Area 0.29 | | | | |
| 2 | Mouza- Mul Survey No. 805 | Area 0.92 | Agriculture | Residential | 22 August, 2024 | 2 |
| 3 | Mouza- Rampur Tukum, Survey No. 72 | Area 0.67 | Agriculture | Residential | 22 August, 2024 | 3 |
| 4 | Mouza- Antargaon Paradwahi, Survey No. 64 | Area 1.08 | Agriculture | Residential | 22 August, 2024 | 4 |

The plan showing the above proposed modification is kept open in the Office of Municipal Council, Mul during the office time for perusal of Public.

Now, in pursuance of Section 37 *(1)* of The Maharashtra Regional And Town Planning Act, 1966 It is hereby notified that any suggestion or objection to the proposed modification as details above shall communicate the same in writing to the Chief Officer, Municipal Council, Mul within period of The Month (30 days) from the date of notification published in the Gazette Government of Maharashtra.

The objection or suggestion if any received within above period will be considered before submitting to the proposal to The Government for Sanction.

YASHWANT PAWAR,
Chief Officer,
Municipal Council, Mul.

Mul :
Dated the 22nd August, 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.